**वाचले :-** १) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नाशिक ता.जि.नाशिक यांचेकडील पत्र क्र.सआसकअना/यचमुव/ ८१४/२०१४ दिनांक १४/०३/२०१४

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे पत्र क्र/साप्रवि/ग्रापं/तक्रार-१/१८६/२०१४ दिनांक १७/०४/२०१४

३) सहायक संचालक, नगररचना, नाशिक यांचे पत्र जा.क्र/जागामागणी/फुलेनगर/ता.नांदगांव/स.नं.३१पै/ ससंना/८३६ दिनांक १/४/२०१४

४) शासन महसुल व वनविभागाकडील परिपत्रक क्र.जमीन/४९७९/२९९०४-सीआर-५३४-ग-८(३) दिनांक १० मार्च १९८६

५) शासनाचे महसुल व वनविभागाचे निर्णय क्र.जमीन/१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१ दिनांक ७/३/२००६

६) शासन महसुल व वनविभाग निर्णय क्र.जमिन/०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दिनांक २७ जुलै २०११

७) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक जमीन ०९/२०१२/प्र.क्र.७९/ ज-१, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१२.

८) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र. जमीन ५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दिनांक १२ जून, २०१३.

९) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन०३/२०११ /प्र.क्र.५३/ज-१ दि.१२/७/२०११

१०) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक गृनियो/२०११/प्र.क्र.१११/ विजाभ-१ दिनांक २७/१२/२०११

११) तहसिलदार नांदगाव यांचे पत्र क्र/जमा-१/कावि/१५७/२०१४ दिनांक २४/०३/२०१४

१२) उपविभागीय अधिकारी, येवला उपविभाग येवला यांचेकडील पत्र क्र.जमाबंदी/कावि/११२/२०१४ दिनांक २५/०३/२०१४

१३) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नाशिक यांचेकडील पत्र क्र.सआसकअना/यचमुवयो/फुलेनगर/ २४२०/२०१४-१५ दिनांक २०/०८/२०१४

१४) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र/मशा/कार्या-२/जमीन-२/प्र.क्र-३१९७/ २०१४ दिनांक ३/०९/२०१४

---

जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
क्र.मशा/कक्ष/३/७/कावि/२१८ /२०१५
नाशिक दि. /०९/२०१४
२०/०३/२०१५

**आगाऊ ताबा आदेश**

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नाशिक यांनी त्यांचे दि.१४/०३/२०१४ चे पत्रान्वये मौजे फुलेनगर ता.नांदगाव येथील ग.नं. ३१ चे क्षेत्र पो.ख. १९ हे.५६आर या जमीनी पैकी १ हे. ०० आर जमीन यशवंतराव मुक्त वसाहत योजनेअंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती या घटकांसाठी घरे बांधण्यासाठी मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

तहसिलदार नांदगाव यांनी त्यांचेकडील पत्र क्र/जमा-१/कावि/१५७/२०१४ दि.२४/०३/२०१४ अन्वये विषयांकित जागा वितरणाकामी शिफारस केली आहे.

सहायक संचालक, नगररचना नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र/जागामागणी/फुलेनगर/ता.नांदगांव/ स.नं.३१पै/संसना/८३६ दि. १/४/२०१४ अन्वये विषयांकित जागेच्या वितरणा बाबत खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

१) संपुर्ण नाशिक जिल्हयाच्या प्रादेशिक योजनेस शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक २१.६.२०१३ च्या अधिसुचना क्र. टिपीस-१११२/५१२(न)/प्र.क्र.९६(न)/१२/पुनर्बांधणी क्र.५१/नवि-९ अन्वये मंजुरी दिलेलो असुन ती दिनांक १६/९/२०१३ पासुन अंमलात आलेली आहे.

सदरहु मंजुर प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार विषयांकित जमीन शेती विभागात समाविष्ट आहे.

२) प्रादेशिक योजना मंजुरीच्या उपरोक्त दिनांक २१/६/२०१३ च्या अधिसुचनेतील फेरबदल क्र.M-२० नुसार खालील प्रमाणे नवीन तरतुद प्रादेशिक योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.९.१३ म्हणुन समाविष्ट करण्यात आलेली आहे.

**Rule No. ९.१३**

" Public semi-public users by Government/Local bodies shall be permissible on the Government or Mulkipad lands throughout the Regian, irrespectre of the zone in which such lands are shown/earmarked in the Regional Plan"

विषयांकित जागेवर उपरोक्त नमुद दिनांक २७/१२/२०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे विमुक्त जाती, भटक्या जमाती या घटकांसाठी राबवावयाची यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना हा वापर सार्वजनिक/निम सार्वजनिक स्वरूपाचा असल्याने उपरोक्त Rule No. १.१३ नुसार सदर जागेवर अपेक्षिलेला वापर करण्यासाठी विषयांकित जागा वितरणा बाबत शिफारस केलेली आहे.

विषयांकित जागा मागणी प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे कडेस सादर केला असता विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र क्र/मशा/कार्या-२/जमीन-२/ प्र.क्र/३१७४/२०१४ दि. ३१/७/२०१४ अन्वये महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक/जमिन/५/ २०११/प्र.क्र/९०/ज-१ दि.२७ जुलै २०११ व महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक/जमिन/०९/२०१२/ प्र.क्र/७९/ज-१, दि. ३० नोव्हेंबर २०१२ मधील निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांना १ हेक्टर ०० आर पर्यंत आगाऊ ताबा देण्याचे अधिकार प्रत्यायोजित केलेले आहेत. या संदर्भातील जमीन वितरणाच्या शासनाच्या अंतिम आदेशास अधिन राहून **मौजे-फुलेनगर** ता. नांदगांव येथील **ग.नं. ३१** क्षेत्र पो.ख. ११ हे. ५६ आर पैकी **१ हे. ०० आर** जागेचा आगाऊ ताबा यशवंतराव मुक्त वसाहत योजनेअंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती या घटकांसाठी घरे बांधण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नाशिक ता.जि.नाशिक यांना महसुल मुक्त व भोगवटामुल्यरहित पध्दतीने विशिष्ट अटी/ शर्तीवर देण्यास मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांनी सुचित केलेले आहे.

वरील बाबी विचारात घेता, मी अपर जिल्हाधिकारी मालेगांव मला शासन महसुल व वनविभाग निर्णय क्र.जमिन/०५११/प्र.क्र.९०/ज-१ दि.२७जुलै २०११ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार तसेच महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ व्दारे (शासकीय जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील तरतुदीनुसार खालील परिशिष्टात दर्शविलेली जागा त्याखालील अटी / शर्तीस अधिन राहुन आगाऊ ताब्याने वितरीत करण्यास अनुमती देत आहे.

**परिशिष्ट**

| तालुका | गांवाचे नांव | गट नं. | वर्ग करावयाचे क्षेत्र | प्रयोजन |
|---|---|---|---|---|
| नांदगाव | फुलेनगर | ३१ | १ हे. ०० आर | **यशवंतराव मुक्त वसाहत योजनेअंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती या घटकांसाठी घरे बांधण्यासाठी** |

**अटी व शर्ती**

१. **(अ)** राज्य शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय, जमीन किंवा जिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध हस्तांतरीत करण्यात येणार नाही.

**(ब)** शर्त (अ) चा भंग केल्याबद्दल जिल्हाधिकारी याबाबतीत निश्चित करील अशा तारखेपर्यंत ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली असेल त्या प्रयोजनासाठी ती देण्यात आली ते विशिष्ट प्रयोजना किंवा प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात आली असेल किंवा राज्य शासनास स्वतःच्या प्रयोजनासाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक वाटेल तर उक्त जमीन तिच्यावर बसविण्यात आलेल्या वस्तु व बांधकाम यांसह राज्य शासनास परत घेता येईल, आणि उक्त जमीन अशा प्रकारे आवश्यक असल्याबद्दलचे जिल्हाधिकाऱ्यांच्या सहीचे प्रतिज्ञापत्र हे, प्रतिग्रहिता व राज्य शासन यांच्यात निर्णायक असेल.

**(क)** शर्त (ब) अन्वये राज्य शासन ती जमीन कोणत्याही वेळी परत घेईल तर, त्यासाठी द्यावयाची भरपाई (त्या जमिनीच्या प्रतिग्रहणार्थ), राज्य शासनाला देण्यात आलेली रक्कम कोणतीही असल्यास व प्रतिग्रहित्याने त्या जमिनीवर अधिकृतरित्या उभारलेली किंवा पार पाडलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकाने यावर (ती जमीन) परत घेण्याच्या वेळी झालेला खर्च किंवा त्याची किंमत या पैकी जी रक्कम कमी असले ती रक्कम या पेक्षा अधिक असणार नाही. या शर्तीन्वये द्यावयाच्या भरपाई रकमेबाबत कोणताही वाद उद्भवल्यास तो वाद राज्य शासनाकडे निर्णयासाठी पाठविण्यांत येईल.

२. प्रस्तुत जागा ज्या प्रयोजनासाठी देण्यांत आली आहे, त्याच प्रयोजनासाठी जागेचा वापर करावा. कोणत्याही परिस्थीतीत वाणिज्यिक किंवा अन्य प्रयोजनासाठी जागेचा वापर करता येणार नाही.

३. तहसिलदार यांनी महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम ६ मधील तरतुदीनुसार नमुना नं. १ मध्ये कबुलायत करून घ्यावी.

४. प्रस्तुत जागेचा विहीत प्रयोजनासाठी वापर करतांना, शासनाच्या कोणत्याही प्रचलित नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. जमीनीची मागणी शासकीय, प्रकल्पासाठी, प्रयोजनासाठीच असल्याची व त्यास सक्षम प्राधिका-याची/ विभागाची प्रशासकीय मान्यता आहे, याची खात्री करावी.

६. जमीनीचे आरक्षणाबाबत तहसिलदार यांनी खात्री करुन तदनंतर आगाऊ ताबा द्यावा.

७. तहसिलदार यांनी प्रत्यक्ष ताबा देण्यापुर्वी त्यांना आवश्यक वाटतील अशा अटी आणि शासनाच्या अन्य अटी व शर्ती मान्य आहेत अशा स्वरुपाचे लेखी हमीपत्र घ्यावे.

८. जमीनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर जमीनीचे संरक्षण करणे, देखभाल करण्याची जबाबतदारी संबंधीत विभागाची राहील.

९. उपोदघातातील अ.क्र. ९ वरील शासन परिपत्रकातील निर्देशानुसार किमान आवश्यक क्षेत्र (Bonafide area requirment) बाबत तहसिलदार यांनी संबंधीत विभागाच्या सक्षम त्याबाबतचे प्रमाणपत्र आगाऊ ताबा देण्यापुर्वी घ्यावे.

१०. प्रश्नाधिन जमिनीचा आगाऊ ताबा मिळाल्यापासुन दोन महिन्यांचे आत सदर जमीन मंजुरीकामी यथोचित प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करावा.

११. उपोदघातातील अ.क्र. ९ वरील शासन शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ९(३) मधील अटी/शर्तीची पुर्तता तहसिलदार यांनी संबधीत विभागास आगाऊ ताबा देण्यापुर्वी करुन घ्यावी.

१२. सदर वापराच्या बांधकामामुळे कोणतेही वहिवाटीचे किंवा विद्यमान रस्ते, नाले बंद होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील.

१३. प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम प्राधीकरणाची परवानगी घेणे आवश्यक राहील.

१४. आगाऊ ताबा देणे पुर्वी अटी शर्ती मान्य असले बाबत लेखी हमीपत्र देणे बंधनकारक आहे.

१५. उपरोक्त आदेशाप्रमाणे गावी ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात आगाऊ ताब्याची नोंद घेणेत यावी. प्रस्तुत जमीन भोगवटादार वर्ग- २ म्हणूनच राहील.

१६. जागा मंजुरीचे आदेशाचे दिनांकापासून दोन वर्षात बांधकाम न केल्यास जिल्हाधिकारी किंवा महसूल विभागाकडून मंजुर जमिनीचा जो भाग वापरात नाही तो भाग काढून घेण्यात येईल.

१७. पथकिनारवर्ती नियमानुसार आवश्यक अंतरे सोडून बांधकाम करणे आवश्यक राहील. प्रस्तुत जमीन पथ किनारवर्ती नियमाचे अनुपाल करण्याच्या अधीन राहून वितरीत करणेत येत आहे.

१८. संबंधित विभागाने धारण केलेली शासकीय जमीन महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ चे लगत (सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे नियम १९७१) मधील नियम २७ अन्वये सदर जमिनीस कलम ४४ अन्वये स्वतंत्र बिनशेती परवानगीची आवश्यकता नाही.

स्वा.प्र.

**अपर जिल्हाधिकारी मालेगांव**

**प्रति,**

१. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नाशिक ता.जि.नाशिक

२. तहसिलदार, नांदगाव यांचेकडेस

२/- उपरोक्त आगाऊ ताबा आदेशात नमुद अटी शर्तीची पुर्तता करुन घेतल्यानंतर आगाऊ ताबा देवुन कब्जेपावती नुसार अधिकार अभिलेखात अंमल घेवुन दुरुस्त ७/१२ व नोंदीच्या उताऱ्यासह परिपुर्ण मुळ प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीकामी या कार्यालयास सादर करावा.

सोबत मुळ संचिका पानांक १ ते जोडली आहे.

प्रत :- १) उपअधिक्षक भुमि अभिलेख, नांदगाव

२) अधिक्षक, भुमि अभिलेख, नांदगाव

३) मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर

स्वा.प्र.

**अपर जिल्हाधिकारी मालेगांव**

393

विभागीय आयुक्तांचे कार्यालय,नाशिकरोड,नाशिक ४२२ १०१
दुरध्वनी क्र : ०२५३ २४६२४०१ ते ०५ फॅक्स क्र : ०२५३ २४६१०६३

क्र.मशा.कार्या.२/जमीन-२/प्र.क्र.३१९७/२०१४ दिनांक : ३/०९/२०१४

प्रति
जिल्हाधिकारी,
नाशिक

विषय : विमुक्त जाती, भटक्या जमाती या घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना.
मौजे फुलेनगर ता.नांदगांव जि.नाशिक येथील ग.क्र.३१ क्षेत्र १९ हे.५६ आर पैकी १ हे.०० आर शासकीय जागा उपलब्ध होणेबाबत.

संदर्भ : आपणाकडील पत्र क्रमांक मह/कक्ष.३/७/कावि-९८/२०१४,दि.२८/५/२०१४.

वरील विषयाबाबतचे उक्त संदर्भीय पत्र पहावे.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय विभाग,व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक गृनियो-२०११/प्र.क्र.१११/विजाभ-१,दिनांक २७ डिसेंबर,२०११ अन्वये,यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेखाली शासनाने राज्यातील विमुक्त जाती,भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटूंबांचे राहणीमान उंचावणे,त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी यासाठी ग्रामीण भागामध्ये अशा कुटूंबांना प्रत्येकी पाच गुंठे जमीन उपलब्ध करुन देऊन त्यावर त्यांना २६९ चौ.फु.ची घरे बांधुन देणे व उर्वरित जागेवर लाभार्थी कुटुबांना विविध शासकीय योजनांद्वारे स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेतलेला आहे. शासनाच्या उक्त निर्णयातील धोरणानुसार जिल्हयातील ३ गांवांची निवड करुन त्या गांवातील एकूण २० कुटुंबांना उक्त योजनेचा लाभ द्यावयाचा आहे. त्यानुसार समाज कल्याण विभाग नाशिक यांनी नांदगांव तालुक्यातील फुलेनगर या गावाची निवड केलेली आहे.

तदअनुषंगाने मौजे फुलेनगर ता.नांदगाव जिल्हा नाशिक येथील ग.नं.३१ क्षेत्र पो.ख.१९ हे.५६ आर या जमीनीपैकी १ हे.०० आर जमीन यशवंतराव मुक्त वसाहत योजनेअंतर्गत विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकांसाठी घरे बांधण्यास मिळणेसाठी आपण प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

सार्वजनिक वापरातील जमीनी/गायरान जमीनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबत व अतिक्रमणे निष्कासित करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१,दिनांक १२ जुलै,२०११ निर्गमित झालेला आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ९ (१) मध्ये असे नमुद आहे की, यापुढे गायरान जमीन अथवा सार्वजनिक वापरातील जमीन फक्त केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत

राबविण्यात येणा-या सार्वजनिक सुविधा (Public Utility) व सार्वजनिक प्रयोजन (Public Purpose) यासाठी अन्य जमीन उपलब्ध नसल्यास याबाबत विचार करावा,

विषयांकित जमीन ही गुरचरण जमीन असुन. अर्जदार विभाग हा राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचा भाग आहे.

शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक जमीन ०५/२०११/प्र.क्र९०/ज-१,दिनांक २७ जुलै,२०११ मध्ये, निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या शासकीय जमीनीचा ताबा राज्य/केंद्र शासनाच्या विविध विभागांना त्यांच्या योजनांसाठी किमान गरजेनुसार देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना १ हे.०० आर पर्यत व १ हे.पेक्षा जास्त मात्र ५ हे. मर्यादेपर्यंत विभागीय आयुक्त यांना प्रत्यायोजित केलेले आहेत.

उक्त शासन निर्णयानुसार मौजे फुलेनगर ता.नांदगाव जिल्हा नाशिक येथील ग.नं.३१ क्षेत्र पो.ख.१९ हे.५६ आर या जमीनीपैकी **१ हे.०० आर** जमीनीचा आगाऊ ताबा यशवंतराव मुक्त वसाहत योजनेअंतर्गत विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकांसाठी घरे बांधण्यासाठी **समाज कल्याण विभागास** देण्यास आपण सक्षम आहात.

शासन घोषीत योजनेची अंमलबजावणी तात्काळ व्हावी या दृष्टीकोनातून, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१,दिनांक १२ जुलै,२०११ मधील परिच्छेद क्रमांक ९ (३) मधील अटी/शर्तीची पुर्तता करुन घेऊन. मौजे फुलेनगर ता.नांदगाव जिल्हा नाशिक येथील ग.नं.३१ क्षेत्र पो.ख.१९ हे.५६ आर या जमीनीपैकी **१ हे.०० आर** जमीनीचा आगाऊ ताबा सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण यांना यथोचित अटी/शर्तीवर देण्याबाबतचा आदेश आपण निर्गमित करावा. व **प्रश्नाधिन जमीनीचा आगाऊ ताबा सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,नाशिक यांना** तात्काळ देण्याबाबतची कार्यवाही करावी.

आगाऊ ताबा दिल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत प्रश्नाधिन जमीनीच्या अंतिम मंजूरीकामी प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी या कार्यालयास सादर करावा.

आपणाकडून प्राप्त झालेली विषयांकित **मुळ संचिका पृ.१ ते ६५** यासमवेत परत पाठविण्यात येत आहे.

स्थळ प्रतीवर मा.विभागीय आयुक्त यांची स्वाक्षरी असे }

विभागीय आयुक्त
नाशिक विभाग करिता

वाचले:- १) श्री. सदाशिव चिमा शिंदे रा.पिंप्राळे ता.नांदगाव यांचा मुदतवाढीचा अर्ज ता. २५/१०/०७,
२) या कार्यालयाचे आदेश क्र. मशा/कक्ष/३/५/१४३२/१९९२, ता.२०/१०/१९९२,
३) शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र. जमीन ३२९५/२ प्र.क्र.१६०/ज-६, दिनांक २९/१/१९८६,
४) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र. एलएनडी/१०९२/प्र.क्र. ८४/ ज-१, दिनांक ३०/६/१९९२,
५) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र. जमीन-१०९७/२२१४/प्र.क्र.१३/ज-१, दिनांक ८/७/१९९९,
६) उपविभागीय अधिकारी, मालेगांव उपविभाग, मालेगांव यांचेकडील पत्र क्र. जमा/१/ कावि/७९७/०८, दिनांक २८/०५/२००८

---

जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
क्र. मशा/कक्ष/३/५/८39 /२००९,
नाशिक. दिनांक 30/10/२००९.

**आदेश**

श्री. सदाशिव चिमा शिंदे रा.पिंप्राळे ता.नांदगांव यांना या कार्यालयाचे आदेश क्र. मशा/कक्ष/३/५/१४३२/१९९२, दिनांक २०/१०/१९९२ अन्वये मौजे पिंप्राळे ता.नांदगांव ग.नं.१३५/अ पैकी १०० चौ.मी. जागा विहीरीसाठी भाडेपट्ट्याने वितरीत करण्यात आलेली आहे. सदर भाडेपट्ट्याची मुदत ता. २०/१०/०७ रोजी संपलेली असल्याने श्री. शिंदे यांनी मुदतवाढीसाठी अर्ज केलेला आहे.

तहसिलदार नांदगांव यांनी सदर अर्जाची सविस्तर चौकशी करुन जागेची मुदतवाढ देणेस हरकत नसलेबाबत अभिप्राय सादर केला आहे. म. सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नाशिक यांनी सदर जागेचे मूल्यांकन १३,०००/- कळविले आहे.

अर्जदार यांनी या कार्यालयाचे पत्र क्र. मशा/कक्ष/३/५/१३/२००९, दिनांक ३/०७/०९ अन्वये सन् २००३ ते २००९ या कालावधीचा भाडेपट्टा व प्राईम लेंडिंग रेटने येणारे व्याज असे एकुण रु.१४९५०/- ( रु. चौदा हजार नऊशे पन्नास मात्र ) चलनाने भरणा केले असुन चलनाची प्रत सादर केली आहे.

यास्तव, उपनिर्दीष्ट ३, ४ व ५ ला अनुसरुन श्री. सदाशिव चिमा शिंदे रा.पिंप्राळे ता.नांदगाव यांना २०/१०/२००७ ते २०/१०/२०१७ या १० वर्षे कालावधीसाठी वार्षिक भाडेपट्टा रु. १९२५/- (रु. एकोणावीस हजार दोनशे पंचवीस मात्र ) इतकी आकारणी करुन मुदतवाढीस मंजुरी देण्यात येत आहे.

इकडील कार्यालयीन आदेश क्र. मशा/कक्ष/३/५/१४३२/१९९२, ता.२०/१०/१९९२ मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती यापुढेही कायम राहतील.

स्थळ प्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

सही/- ३०/१०
जिल्हाधिकारी नाशिक करिता

प्रति,
श्री. सदाशिव चिमा शिंदे
रा.पिंप्राळे ता.नांदगांव

प्रत : तहसिलदार नांदगाव यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

संदर्भ :- १] श्री. प्रकाश सुकदेव कर्नर रा. तांदुळवाडी
ता. नांदगाव यांचा अर्ज
२] महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाकडील ठराव क्र. ७२३४/४२
दि. २३.११.९०
३] शासन महसुल व वन विभागाकडील परिपत्रक क्र. जमिन. ३०८०/७३१२/
ग. १ दिनांक ९.१०.१९८०
४] इकडील कार्यालयीन आदेश क्र. मशा/कक्ष-३/५/ ५८७/१९९८
दिनांक

------

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक
क्र. कक्ष. ३.५. १३०७/९८.
नाशिक. दिनांक:- २१/११/१९९८

आदेश :-

श्री. प्रकाश सुकदेव कर्नर रा. तांदुळवाडी ता. नांदगाव यांनी मौजे तांदुळवाडी येथील गट नं. १८३ क्षेत्र हे. ७४०० आर. ये क्षेत्रापैकी १०० चौ. मिटर जागा विहीर खोदणे-साठी मागीतली असुन सदरचे विहीरीचे पाणी ग. न. १५३,१५१,१४८,१३७,१५३,१५२,१५४,१५० व १५१ या जमिनी खालुन १६५० मिटर लांब अंतराने पाईपलाईन टाकुन त्यांचे मालकीचा गटनंबर १११/१ या जमिनीस पाणी नेणेसाठी परवानगी मागीतली आहे.

म. तहसिलदार नांदगाव यांनी अर्जाची चौकशी करुन अहवाल पाठविला आहे. पाईपलाईन सरकारी जमिनीतुन जाते/खाजगी जमिनीतुन जाते/जात नाही. त्यासाठी खाजगी जमिन मालकाची संमती घेतलेली आहे/नाही. अर्जदारा शिवाय इतर कोणीही जागा मागणी केलेली नसुन जागा सार्वजनिक कामासाठी राखुन ठेवण्यात आलेली नाही. मागणी जागेचा नकाशा पा. नं. ७३ वर उपलब्ध आहे.

इसमास जागा देणे बाबत गावकऱ्यांची हरकत नाही. जागा देणे बाबत ग्रामपंचायत तांदुळवाडी ता. नांदगाव यांनी ठराव क्र. २३/३ दि. २८-७-१९९७ अन्वये संमती दिलेली आहे.

मागणी जागा ग्रामपंचायत तांदुळवाडी यांचे ताब्यात असल्याने मौजे तांदुळवाडी ता. नांदगाव येथील ग. नं. १८३ पैकी विहीरीसाठी मागणी केलेले क्षेत्र १०० चौ. मी. हे ग्रामपंचायत तांदुळवाडी ता. नांदगाव यांचेकडुन इकडील आदेश क्र. मशा. कक्ष. ३.५./ ५८७/९८ दि. १९.०८.१९९८ अन्वये सरकारी आकारी पडितात दाखल करण्यात आलेली आहे.

पंचनामे मागणी जागेची किमत रु. ५००/- येते. खरेदिविक्रीचे तक्त्याप्रमाणे मागणी जागेची किमत रु. ३७४/- येते. प्रस्तुत प्रकरणी पंचनामे ~~खरेदिविक्रीचे तक्त्याप्रमाणे~~ मागणी जागेची किमत ग्राह्य धरणेस हरकत नाही. अर्जदार कब्जा हक्काची रक्कम भरणेस तयार असुन जागा १५ वर्षाचे कराराने घेणेस तयार आहेत.

..२/-

भागणी जमिनीची किंमत लिजरेंट इ. तपशिल खालील नमुद केल्याप्रमाणे आहे.

| जमिनीचा तपशिल | क्षेत्र | बाजार भावाप्रमाणे किंमत रुपये. | बिनशेती आकाराचे १६ पट ०.२ पैसे दर चौ.मी. | पूर्ण बाजार भावाप्रमाणे किंमत | वार्षिक भाडे लिजरेंट [१५% प्रमाणे. |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ०२. | ०३. | ०४. | ०५. | ०६. |
| मौजे कांदळवाडी, ता. नांदगाव स.नं. १८ पैकी.... विहीरीसाठी | चौ.मी. १०० | ४००/- | १६/- | ४१६/- | रु. [illegible]/- |
| अतरी जागा चौ.मी. पाईपलाईनसाठी घेतलेला भाडेपट्टा | २५५ | | | १५५०/- | रु. २३०/- |
| | | | | एकूण | रु. ३२०/- |

शासन ठराव दि. २२.११.१९५० परिपत्रक ता. ९.१०.१९८० व म. आयुक्त मुंबई विभाग यांनी त्यांचे कडील पत्र क्र. आरबी. डेस्क. २. एलएनडी. ५६५ ता. २०.२.८० प्रमाणे शिफारस केल्यावरुन १०० चौ. मि. जमिन विहीरीसाठी १५ वर्षाचे करारान्वये वार्षिक भाडे घेऊन आणि तसेच महाराष्ट्र जमिन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम १९७१ चे नियम ३९ प्रमाणे सरकारी जागेतुन १०० चौ. मिटर जागा १५ वर्षाचे भाडेपट्ट्याने जागा खालील शर्तीवर मंजुर करण्यात येत आहे.

शर्ती:-१] अर्जदाराने जमिनीचा उपयोग विहीरीचे बांधकामासाठी व पाईपलाईनसाठीच केला पाहिजे.

२] अर्जदार यांनी विहीर व पाईप लाईनपासुन जिवितास किंवा इतर धोका पोहोचणार नाही याची खबरदारी घ्यावी व म. तहसिलदार यांनी दिलेल्या सुचना प्रमाणे वागावे.

३] शासनाकडुन जेव्हा सुधारित आदेश येतील ते अर्जदार यांचे बंधनकारक राहतील या शर्तीवर कौरराने देणेत येत आहे.

४] सदर विहीरीचा दुरुपयोग झाल्याचे तहसिलदार यांचे निदर्शनास आल्यास व वरील शर्त क्र.२ ची पुर्तता न झाल्याचे आढळुन आल्यास तहसिलदार हे एक महिन्याची नोटीस देऊन सदरची विहीर अर्जदारास बुजवुन टाकणेबाबत हुकूम देतील यात चुकल्यास तर्फे तहसिलदार यांचेकडुन विहीर सरकारी खर्चाने बुजवुन टाकतील व जागा सरकार जमा करणेत येईल याकामी झालेला खर्च सर्व जमिन महसुलाची थकबाकी म्हणुन वसुल करणेत येईल.

५] दरवर्षी महसुली वर्ष १ ऑगस्ट ते ३१ जुलै यामध्ये आत अर्जदाराने ठरलेला भाडेपट्टा तहसिलदाराकडे भरणा करावा.

६] पाईपलाईनचे जागेबाबत अर्जदार यांनी पाईपलाईन चांगल्या स्थितीत ठेवावी. तिच्यापासुन जिवीतास अगर इतर नुकसानीस धोका पोहोचणार नाही याची खबरदारी घ्यावी व तहसिलदार यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे वागावे.

७] पाईपलाईनचा उपयोग शर्त क्र. ६ प्रमाणे व म. तहसिलदार यांचे संमतीने करावा. जर वरील शर्तीचा भंग झाल्यास पुर्ण भरपाई करुन द्यावी लागेल.

..३/-

८] नैसर्गिक आपत्ती जसे जास्त पाऊस वगैरेपासून होणारे नुकसान होणार हि यासाठी अर्जदार यांनी सुरक्षा उपाय करावेत.

९] विहीरीचे काम पुर्ण झाल्यावर विहीरीचे कठडे थोटवरपर्यंत बांधून घ्यावेत की, ज्यामुळे गांवातील लोकांना जनावरांना त्यापासून केव्हाही धोका निर्माण होणार नाही.

१०] महाराष्ट्र जमिन महसुल [सरकारी जमिनींची विल्हेवाट] नियम १९७१ चे नियम ३९[४] अन्वये कोणत्याही प्रकारचे केलेल्या कराराचा भंग होणार नाही याबद्दल अर्जदाराने खबरदारी घ्यावी.

११] ज्या-ज्या वेळी गांवी पाणीटंचाई भासेल त्यावेळी अर्जदार यांनी गांवातील लोकांना व जनावरांना पाणी पिण्यासाठी कोणताही अडथळा करु नये तसेच गांवासाठी मोफत पाणीपुरवठा करावा लागेल.

१२] प्रस्तुत विहीरीचे लगत नाला असल्यास तो पुढील काळात नदी अधिसुचित झाल्यास त्यापुढील पाणी परवानगी बाबत पाटबंधारे खात्याची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१३] वरीलपैकी कोणत्याही शर्तींचा भंग झाल्यास शर्त क्र.४ मध्ये लिहिल्या प्रमाणे तजविज करणेस अर्जदार पात्र राहतील.

१४] महाराष्ट्र जमिन महसुल [ सरकारी जमिनीची विल्हेवाट] नावणी नियम १९७१ चे नियम ३९[४] मध्ये नमुद केल्या प्रमाणे नमुना आठ मध्ये करारनामा करुन दिले शिवाय कामास सुरुवात करु नये.

१५] भाडेपट्टयाची मुदत दहा वर्षापर्यंत राहिल. दहा वर्षानंतर भाडेपट्टा बदलणेस पात्र राहील.

१६] विहीरीच्या बांधकामामुळे नदीच्या किंवा ओढयाच्या नैसर्गिक प्रवाहाला बाधा क पेऊ नये.

१७] जरी नदीच्या/ओढयाच्या पात्राचा सबंधीत भाग किंवा लगतचा भाग अधिसुचित करण्यात आला तर भाडे पट्टयाचा करार रद्द होईल/करण्यात येईल. त्या संदर्भात कोणत्याही त-हेची नुकसान भरपाई न देता सबंधीत जमीन शासनाच्या ताब्यात घेण्यात येईल.

..४/-

१८] पट्टेदार विहीर असलेली जागा पुर्ववत करुन देईल. जर पट्टेदार विहीत मुदतीत जागा पुर्ववत करुन देण्यास तयार नसेल तर तहसिलदार ती जागा पुर्ववत करील व त्यासाठी येणारा खर्च भरण्यास पट्टेदार पात्र राहील किंवा शासकिय महसूल थकबाकीची वसुली म्हणुन तो खर्च पट्टेदाराकडुन वसूल करण्यात येईल.

१९]. तसेच जर अशी ओढा पात्रातील विहीर बुजविणे काही तत्कालीक कारणामुळे आवश्यक नसेल व जर भाडेपट्टा चालु ठेवणे पाटबंधारे विभागाच्या पुर्ण अभ्यासाअंती शक्य असेल तर पट्टेदारास नवीन भाडेपट्टा करार पाटबंधारे विभागाशी करावा लागेल वा पाणी उचलण्याबाबत रितसर परवानगी घ्यावी लागेल व त्याबद्दल त्यात प्रचलित नियमानुसार असणारी पाणीपट्टी देणे बंधनकारक राहील.

सही/- xxx
जिल्हाधिकारी नाशिक

प्रति,

श्री. **प्रल्हाद सुकदेव कनोर,**
**रा. तांदुळवाडी, ता. नांदगाव, जिल्हा- नाशिक.**

प्रत :- माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

१] मुळ कागदपत्रासह म. तहसिलदार, **नांदगाव** यांचेकडेस अग्रेषित(पा. नं. [illegible])

२] म. उपविभागीय अधिकारी, **मालेगाव** उपविभाग, **मालेगाव**

३] म. तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, **नांदगाव** यांचेकडेस

४] म. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी स.अग्रेषित.

५] तलाठी, **तांदुळवाडी** तालुका **नांदगाव** यांचेकडेस माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

जिल्हाधिकारी नाशिक करिता.

वाचले :- १) कार्यकारी अभियंता(स्था), महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत, नाशिक यांचेकडील पत्र क्र.काअ/स्था/स्था.बां.व.सु./नाशिक/तांत्रिक/२५३४, दि.५/१२/२००८.

२) शासन महसुल व वनविभाग, परिपत्रक क्र. LND १०९० / २२०२३१ / प्र.क्र. २००/ज-१ दि. ०५/०४/१९९१.

३) शासन महसुल व वनविभाग, निर्णय क्र. जमीन १०/२००५/प्र.क्र.३८/ज - १ दि. ०७/०३/२००६.

४) उपविभागीय अधिकारी, मालेगाव उपविभाग, मालेगाव यांचेकडील चौकशी अहवाल क्र.जमा/१/कावि/७११/२००९, दि.१८/०७/२००९.

---

**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.**
क्र. मशा / कक्ष.३/५/ ४९७ / २०१०.
नाशिक. दि. २१ / ०५ / २०१०.

## आदेश

कार्यकारी अभियंता(स्था), महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लि. नाशिक यांचेकडील पत्र क्र. काअ/स्था/स्था.बा.व.सु./नाशिक/तांत्रिक/२५३४, दि. ५/१२/२००८ अंन्वये मौ. बेजगांव, ता. नांदगांव येथील ग.नं. १४२ पैकी हे. ०.२५ आर जागेचा ३३/११ के. व्ही उपकेंद्र उभारणीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. कार्यकारी अभियंता(स्था) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, खरबंदा पार्क, व्दारका, नाशिक यांनी भोगाधिकार मुल्य निश्चीत केल्यानंतर भोगाधिकाराची जी रक्कम देय ठरेल ती रक्कम शासनाच्या स्थाई आदेशाप्रमाणे होणा-या व्याजासह भरणा करावयास तयार असलेबाबत हमीपत्र लिहुन दिले आहे. उपविभागीय अधिकारी मालेगांव उपविभाग मालेगाव यांनी प्रस्तुत प्रस्तावाची सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर केला आहे व जागा वितरणासाठी शिफारस केली आहे.

ग्रामपंचायत बेजगांव, ता. ~~सिन्नर~~ नांदगांव यांनी जमिन देण्यास संमती असल्याबाबत ठराव क्र. ६७, दि.२३/०६/२००६ रोजी मंजुर केला आहे. तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, नांदगाव यांनी मागणी जागेचा मोजणी नकाशा सादर केला आहे. सहाय्यक संचालक, नगररचना, नाशिक यांचेकडील पत्र क्र. जामा/मौ.बेजगांव, ता. नांदगांव / ग.नं.१४२ पै./ससंना/२१८९, दिनांक ३/०८/२००९ अन्वये विहीत अटीस अधीन राहुन जागा वितरीत करणेस हरकत नसले बाबत अभिप्राय दिले आहेत. अट क्र. १ नुसार मागणी जागेस किमान १२.०० मी. रुंद पोहोच रस्ता उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील या. अटीस अधिन राहुन प्रकरणी जागा वितरणाचे अभिप्राय देणेत येत आहे, असे नमुद केलेले आहे.

सह जिल्हा निबंधक, वर्ग १, मुद्रांक मूल्यांकन विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्र. कक्ष-टिपी/मुल्यांकन/४९०/१०, दिनांक २८/०१/२०१० चे पत्रान्वये म.रा.वि.वि.कंपनीने मागणी केल्यानुसार हे.०.२५ आर क्षेत्राचे मुल्यांकन रु.१,६३,२००/- (रु. एक लक्ष त्रेसष्ठ हजार दोनशे मात्र ) कळविलेले आहे. या कार्यालयाचे पत्र क्र.मशा/कक्ष ३/५/१३२/१०, दि. १८/०२/२०१० अन्वये तात्पुरती कबजे हक्काची रक्कम रु.१,६३,०००/- शासकीय खजिन्यात भरण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार म.रा.वि.वि.कपनीने दिनांक ३/०३/२०१० रोजी सदर रक्कम शासकीय खजिन्यात भरणा केलेबाबत चलनाची प्रत इकडेस सादर केली आहे.

शासन महसुल व वनविभाग, परिपत्रक क्र.एलएनडी १०९०/२२०२३१/प्र.क्र.२०० / ज -१ दि. ०५/०४/१९९१ व शासन महसुल व वनविभाग, निर्णय क्र. जमीन १०/२००५/प्र.क्र.३८/ज - १ दि. ०७/०३/२००६ अन्वये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला शर्तींस अधीन राहुन आगाऊ ताबा देण्याची तरतुद आहे.

यास्तव मी, जिल्हाधिकारी नाशिक, याव्दारे असा आदेश देतो की, मौ. बेजगांव, ता. नांदगांव येथील ग.नं. १४२ पैकी हे. ०.२५ आर क्षेत्र मोजणी नकाशात दर्शविल्याप्रमाणे आगाऊ ताबा

कार्यकारी अभियंता(स्था), महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., व्दारका, नाशिक यांना खालील शर्तीस अधिन राहुन देणेत यावा.

**शर्ती :-**

१) ज्या कारणासाठी जमिनीचा वापर करणेस अनुमती देणेत आली आहे, त्याशिवाय इतर कारणासाठी वापर करता येणार नाही.

२) जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यामुळे त्या जमिनीचे अतिक्रमणापासुन संरक्षण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची राहील व जमिनीचा वापर उपकेंद्रासाठी करावयाचा न झाल्यास ती जमिन कोणतीही नुकसान भरपाई न मागता शासनास परत करावी लागेल.

३) सार्वजनिक बांधकाम विभाग व वन विभाग यांचे जागा वितरणाबाबत अभिप्राय प्राप्त झाल्याशिवाय सदरहु विद्युत उपकेंद्राचे बांधकाम सुरु करता येणार नाही.

४) शासनाचे आदेशानुसार प्रस्तुत जमिनीची अंतिम कब्जेहक्काची रक्कम निश्चित झाल्यानंतर तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम व अंतिम कब्जेहक्काची रक्कम यातील फरकाची रक्कम प्राईम लेंडिंग रेटने होणाऱ्या व्याजासह म.रा.वि.वि. कंपनीस भरावी लागेल.

५) विहीत नमुन्यातील करारनामा मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार मुद्रांक शुल्क लावुन त्यांची नोंदणी केल्यानंतरच जमिनीचा ताबा देणेत येईल.

मा.जिल्हाधिकारी यांचे
मंजुरीने

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी नाशिक करिता**

प्रती,
*कार्यकारी अभियंता(स्था),*
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत,
नाशिक

प्रत : तहसिलदार नांदगांव,

२/- सोबत चौकशी संचिका पानांक १ ते ~~२५३~~ 289 जोडलेली आहे, चौकशी संचिकेतील पानांक २२७ वरील मोजणी नकाशाप्रमाणे मौ. बेजगांव, ता. नांदगांव येथील ग.नं. १४२ पैकी हे. ०.२५ आर जागेचा जागेचा आगावु ताबा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास देवुन कब्जे पावतीसह पुर्तता अहवाल तात्काळ सादर करावा. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांचेकडून शासन परिपत्रक दि.३१/१०/२००६ मधील - नमुन्यामध्ये तसेच वरील प्रमाणे अटीशर्ती टाकुन कबुलायत करुन दुय्यम निबंधक नाशिक यांचेकडे कबुलायत नोंदणी करुन घेतलेनंतरच जमिनीचा ताबा देणेत यावा. गाव न.नं. २ व ता.न.न.२ मध्ये नोंदी घेऊन अर्जदार यांचेकडुन दरवर्षी बिनशेती सारा व उपकर वसूल करणेची कार्यवाही करावी. गा.न.नं ६ व ७/१२ मध्ये योग्य त्या नोंदी घेणेत याव्यात. व दुरुस्त ७/१२ व नोंदीचे उता-यासह अहवाल पाठवावा.

प्रत : उपविभागीय अधिकारी, मालेगांव उपविभाग, मालेगांव यांचेकडेस माहितीसाठी स.अग्रेषित.

तहसिल कार्यालय नांदगाव
आवक क्र. 5[illegible]
26/4 2010
52 तहसिलदार नांदगाव

प्राप्त
385
C.O.
26/4/2010

**जिल्हाधिकारी नाशिक करिता**

वाचले :-१) कार्यकारी अभियंता(स्था), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.स्थापत्य विभाग नाशिक यांचे कडील प्रस्ताव दि. ०८/०५/२०१४.
२) शासन महसुल व वनविभाग, परिपत्रक क्र. एलएनडी १०९० / २२०२३१ / प्र.क्र. २०० ज - १ दि. ०५ / ०४ / १९९१.
३) शासन महसुल व वनविभाग, निर्णय.क्र. जमीन १०/२००५/प्र.क्र.३८/ज १ दि. ०७ /०३/०६.
४) उपविभागीय अधिकारी येवला यांचे पत्र क्र. जमा/कावि/४४३/२०१५ दि. २८/०४/२०१५
५) सहाय्यक संचालक, नगर रचना, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र./जागा मागणी मौजे पांझणदेव ता. नादगांव/ससंना/१५१४ दि. ०१/०८/२०१५
६) ग्रामपंचायत पांझणदेव ता. नांदगांव यांचेकडील ठराव क्र २२ दि २/१०/२०१२
७) मुख्य कार्यकारी अधिकारी जि प नाशिक यांचेकडील अहवाल जा.क्र./साप्रवि/. ग्राप /तक्रार-१/४५५/२०१५ दि २९/०६/२०१५
८) दुय्यम निबंधक श्रेणी-१, नादगांव यांचे कडील मुल्यांकन/८२/१५ दि.१०/७/२०१५
९) कब्जाहक्क रक्कम भरणा केलेले डिफेस चलन २१/०१/२०१६.

(२०४)

तहसिल कार्यालय, नांदगांव
आवक क्र. जमा ९
10 FEB 2016

जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.
क्र.मशा/कक्ष३/५/२०१६/३३/१४०/१००२
नाशिक. दि. ०८/०२/२०१६

**कब्जेहक्काबाबा आदेश**

कार्यकारी अभियंता(स्था), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी नाशिक यांनी मौजे पांझनदेव, ता. नादगांव, जि. नाशिक येथील गट नं. ६५ पैकी क्षेत्र ० हे ४० आर ३३/११ के. व्ही उपकेंद्र उभारणीसाठी जागा मागणी प्रस्ताव सादर केला आहे.

उपविभागीय अधिकारी, येवला यांनी सदर जागा मागणी प्रस्तावाची चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांनी देखिल सकस आहार योजनेकडील वर्ग असलेल्या जागेपकी ४० आर जागा विद्युत उपकेंद्र या प्रयोजनाकरिता जागा वितरीत करण्यास शिफारस केलेली आहे. तसेच सहाय्यक संचालक नगररचना, यांनी विहित अटी व शर्तींच्या अधिन राहुन जागा वितरणास शिफारस केलेली आहे. सदर बाबत विद्युत कंपनीने कब्जाहक्क रकमेच्या फरकाचे व व्याजाचे रक्कमेबाबत हमीपत्र लिहुन दिले आहे.

दुय्यम निबंधक श्रेणी-१, नांदगाव यांचेकडील पत्र दि १०/०७/२०१५ नूसार म.रा.वि वितरण कंपनीने मागणी केल्यानुसार ० हे ४० आर क्षेत्राचे एकूण मुल्यांकन रु ४,०५,०००/- (रु. चार लाख पाच हजार मात्र ) कळविलेले आहे.

या कार्यालयाचे पत्र क्र.मशा/कक्ष ३/५/२०१५/३३/१४०/१३००० दि.३०/१२/१५ अन्वये तात्पुरती कब्जे हक्काची रक्कम शासकीय खजिन्यात भरण्याबाबत म रा वि वि कंपनीस कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर रक्कम म.रा.वि.वितरण कंपनीने दिनांक २१/०१/२०१६ रोजी शासकीय खजिन्यात भरणा करुन डिफेस केलेल्या चलनाची प्रत इकडेस सादर केलेली आहे.

G:\MSEB\ORDER Panjandeav tal Nandgav.doc

शासन महसुल व वनविभाग, परिपत्रक क्र.एलएनडी १०९०/२२०२३१ /प्र.क्र.२००/ज-१ दि. ०५/०४/१९९१ व शासन महसुल व वनविभाग, निर्णय क्र. जमिन १०/२००५/प्र.क्र.३८/ ज-१ दि. ०७/०३/२००६ तसेच शासन निर्णय क्र जमिन ०५/२०११/प्र क्र ९०/ज १ दि २७ जुलै २०११ व शुध्दीपत्रक क्र जमिन ०५/२०१२/प्र क्र ९०/ज ९ दि १७/१०/२०११ अन्वये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला शर्तीस अधीन राहुन आगाऊ ताबा देण्याची तरतुद आहे.

**यास्तव मी, अपर जिल्हाधिकारी मालेगांव, या आदेशाद्वारे** उप अधिक्षक भूमी **अभिलेख, नादगांव यांनी दिनाक १८/१२/२०१४** च्या मोजणी नकाशात दर्शविलेले, **मौजे पांझणदेव ता. नादगांव** जि नाशिक येथील गट नं. ६५ पैकी क्षेत्र ० हे ४० आर क्षेत्राचा आगाऊ ताबा कार्यकारी अभियंता(स्था), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. नाशिक यांना ३३/११ के व्ही उपकेंद्र उभारणीकरिता देणेस खालील शर्तीस अधिन राहून परवानगी देत आहे.

**शर्ती :-**

१. मंजुर केलेल्या जागेचा वापर फक्त ३३/११ के.व्ही. उपकेंद्र उभारणे साठीच करावा लागेल.त्या खेरीज इतर प्रयोजनासाठी जागेचा वापर करता येणार नाही.
२. जमीनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर जमीनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी म.रा.वि.वितरण कंपनीची राहील. तसेच जमिनीचा वापर विद्युत उपकेंद्रासाठी करायचा न झाल्यास जमीन शासनास कोणत्याही नुकसान भरपाई विना परत करावी लागेल.तसेच शासनाचे आदेशानुसार प्रस्तूत जमिनीची अनर्जित रक्कमेच्या तफावतीची अंतिम कब्जेहक्काची रक्कम निश्चित झाल्यानंतर तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम व अंतिम कब्जेहक्काची रक्कम यातील फरकाची रक्कम प्राईम लेंडिंग रेटने होणाऱ्या व्याजासह म.रा.वि.वितरण कंपनीस भरावी लागेल.
३. शासनाचे आदेशानूसार प्रस्तूत जमिनीची अनर्जित रक्कमेच्या तफावतीची अंतिम कब्जेहक्काची रक्कम निश्चित झाल्यानंतर तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम व अंतिम कब्जेहक्काची रक्कम यातील फरकाची रक्कम प्राईम लेंडिंग रेटने होणाऱ्या व्याजासह म.रा.वि.वितरण कंपनीस भरावी लागेल.
४. विषयांकित जागेस किमान १२.०० मी. रुंद पोच रस्ता तयार करणे आवश्यक राहील.
५. विहीत नमुन्यातील करारनामा मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार मुद्रांक शुल्क लावुन त्यांची नोंदणी केल्यानंतरच जमिनीचा ताबा देणेत येईल.
६. प्रस्तूत जमीन पथकिनारवर्ती नियमाचे अनुपालन करण्याच्या अधिन राहुन वितरीत करणेत येत आहे.
७. सदरची जागा अगर तिचा कोणताही भाग महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ३६(४)मध्ये केलेल्या तरतुदी सोडून शासनाचे परवानगी शिवाय हस्तातरण,गहाण,विक्री अगर तारण करता येणार नाही.
८. जमिनीवरील सर्व खाणी,खनिज पदार्थ तसेच दगडखाणी यावरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकाराचे अधीन राहून जमिन देण्यात येईल व उक्त द्रव्ये शोधण्याच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ मधील तरतुदीप्रमाणे त्या ठिकाणी प्रवेश करण्याचे संपुर्ण अधिकार आहेत.
९. जर जमीनीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची कोणत्याही प्रयोजनासाठी भविष्यात शासनाला आवश्यकता असेल त्या जमीनीसाठी किंवा तिच्या कोणत्याही भागासाठी जमिन

घेणा-याने दिलेल्या जमिनीच्या किमती एवढी भरपाई दिल्यानंतर आणि जमिनीत कोणतेही बांधकाम असल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग ठरवेल त्यानुसार इमारतीचा किंवा बांधकामाचा खर्च दिल्यानंतर शासनास जमिन परत करण्यात येईल.

१०.खुल्या जागेत दर १० मी ला एक या प्रमाणे योग्य जातीची झाडे लावुन त्याची जोपासना करावी.

११.जागेचा ताबा घेतल्यापासून जागेवर अतिक्रमण होवु न देणे ही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची जबाबदारी राहील.

१२.मंजूर जागेचा बिनशेती सारा व त्यावरील उपकर नियमितपणे दरवर्षी कामगार तलाठी यांचेकडेस भरणा करावा.सदर बिनशेती सारा बदलणेस पात्र राहील.

१३.मंजूर जागा अर्जदार भोगवटदार वर्ग २ म्हणून धारण करतील.

१४.मंजूर जागेचा अभिन्यास व बांधकाम नकाशा सक्षम अधिकारी यांचेकडून मंजूर करुन घ्यावा,त्याशिवाय बांधकाम करु नये.

१५.राज्य शासनाच्या परवानगी शिवाय जमिनीची पोट विभागणी करता येणार नाही किंवा ती कोणत्याही प्रकारे निकालात काढता येणार नाही.

१६.वर नमुद केलेल्या अटीपैकी कोणत्याही अटी शर्तीचे आणी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे उपबंध आणि तरतुदीन्वये करण्यात आलेले नियम लक्षात घेऊन व तहसिलदार ज्या इतर शर्ती लादतील अशा शर्ती पैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जमिनीचे प्रदान रद्द करण्यात येईल आणी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता ती जमिन शासनाकडेस काढून घेणेत येईल.

**स्वाक्षरी/---**
**अपर जिल्हाधिकारी मालेगांव**

**प्रति,**
कार्यकारी अभियंता(स्था), महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत, नाशिक
**प्रत** : तहसिलदार नादगांव

२/-. सोबत चौकशी संचिका पानांक १ ते ९३५ जोडलेली आहे, चौकशी संचिकेतील **पानांक** ८७ वरील मोजणी नकाशाप्रमाणे **मौ. पांझनदेव ता. नादगांव** जि नाशिक येथील ६५ पैकी ० हे ४० आर जागेचा आगाऊ ताबा शासन परिपत्रक दि.३१/१०/२००६ मधील नमुन्यामध्ये तसेच वरील प्रमाणे अटीशर्ती टाकून करारनामा करुन दुय्यम निबंधक **नादगांव** यांचेकडे करारनामा नोंदणी करुन घेतलेनंतरच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस जमिनीचा ताबा देणेत यावा. गाव न.नं. २ व ता.न.न.२ मध्ये नोंदी घेऊन अर्जदार यांचेकडून दरवर्षी बिनशेती सारा व उपकर वसूल करणेची कार्यवाही करावी. गा.न.नं ६ व ७/१२ मध्ये योग्य त्या नोंदी घेणेत याव्यात. **वीज वितरण कंपनीचे नांव मंजुर क्षेत्रापुरते ७/१२ उता-यावर प्रस्तावास अंतिम मान्यता मिळेपावेतो इतर अधिकारात दाखल करावे. तसेच सदर जागेचा प्रस्ताव अंतिम मान्यतेकामी तात्काळ इकडेस पाठवावा.**

**प्रत** : उपविभागीय अधिकारी, येवला उपविभाग येवला

अपर जिल्हाधिकारी (नाशिक)

**अपर जिल्हाधिकारी मालेगांव**

G:\MSEB\ORDER Panjandeav tal Nandgav.doc